जनसंपर्क कक्ष
0 3 MAR 2023
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
तरुण भारत

# विद्यापीठात घडले जपानी कला संस्कृतीचे दर्शन

## जपानी विद्यार्थ्यांनी केले लोकनृत्यासह खेळांचे सादरीकरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जपानी ओरिगामी कला, पारंपरिक खेळ, वस्त्रपरंपरा, चित्रकला, संगीताच्या साथीने शिवाजी विद्यापीठाला जपानी कला संस्कृतिचे दर्शन झाले. विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी जपानी संस्कृती पाहून भारावून गेले. जपानच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट देवून विदेशी भाषा विभागासह प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच विद्यापीठ परिसराची पाहणी करून जैवविविधतेची माहिती घेतली..

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनीही आपल्या जपानी व रशियन भाषा कौशल्यासह त्या भाषांतील गीत-संगीताच्या ज्ञानाचेही सादरीकरण केले.



**कोल्हापूर : जपानी शिष्टमंडळाचे ग्रंथभेट देवून स्वागत करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. मेघा पानसरे, डॉ. एस. बी. सादळे,**

समन्वयक सायुरी मात्सुनो, क्योतो सेइका विद्यापीठातील प्रा. शिन मात्सुमुरा, कोता तोदा, युको यासुइ, तसेच विविध विद्याशाखांचे विद्यार्थी रिन्तारो फुजिता, तेम्मा मियोशी, कोता योशिओका, रियोता सकामोतो, केन योशिकावा, त्सुमुगी निशिमुरा, मोएको नाइतो, युकिका नारादाते, कुणाल मात्सुनो या प्रतिनिधींचा शिष्टमंडळात समावेश होता. त्यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेवून जपानी भाषा शिकणाऱ्यांना जपानमधील विविध कंपन्यांमध्ये नोकरीची संधी असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. मेघा पानसरे व इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनीही चर्चेत सहभाग नोंदवला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 MAR 2023
सकाळ

## शिवाजी विद्यापीठाची नवी सुविधा; विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांचा वेळ वाचणार

# आता कोणतीही 'फी' भरा ऑनलाईन


▸ संतोष मिठारी, सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. २ : परीक्षा, गुणपत्रक, पदवीप्रमाणपत्र, कॉलेज मान्यता आदींबाबतची फी (शुल्क) भरण्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांना शिवाजी विद्यापीठात यावे लागत होते. त्यात वेळ, पैसे अधिक खर्च व्हायचे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाने फी भरण्याची पूर्णपणे ऑनलाईन पेमेंट सुविधा सुरू केली आहे.

विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांना विविध ४५० प्रकारांतील शुल्क भरण्यासाठी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमधील जमा स्वीकृती विभागात प्रत्यक्षात उपस्थित राहावे लागत होते. दिवसभर या विभागाबाहेर रांग लागलेली असायची. अनेकांचा फी भरण्यासाठी दिवस खर्च व्हायचा. ते टाळण्यासाठी वित्त व लेखा विभागाने 'ऑनलाईन रिसीट पोर्टल' तयार केले. त्याचा वापर सुरुवातीला १ जानेवारीपासून विद्यापीठ कॅम्पसमधील विद्यार्थी, कर्मचाऱ्यांसाठी केला. त्याच्या यशस्वीतेनंतर या सुविधेची व्याप्ती वाढविण्यात आली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी दि. १ फेब्रुवारीपासून संबंधित सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.



**कोल्हापूर : परीक्षा, गुणपत्रक, पदवी प्रमाणपत्र, महाविद्यालय मान्यता आदींबाबतचे शुल्क भरण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागाने सुरू केलेली नवी ऑनलाईन सुविधा.**

'ऑनलाईन फी भरण्याची सुविधा यंदा केवळ दीक्षान्त समारंभानिमित्त पदवी प्रमाणपत्र घेणाऱ्यांसाठी उपलब्ध होती. आता ही सुविधा सर्वांसाठी सुरू केली आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या वेळ, पैशांची बचत झाली आहे.

**- अजित चौगुले,** वित्त व लेखाधिकारी

'या ऑनलाईन रिसीट-पेमेंट सुविधेमुळे शुल्क भरण्याची प्रक्रिया सोपी, सुटसुटीत झाली आहे. वेळ वाचत असून, ही सुविधा आम्हा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणारी आहे.

**- सत्यजित पाटील,** संशोधक विद्यार्थी

### अशी आहे नवी सुविधा

■ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'ऑनलाईन रिसीट पोर्टल'चा टॅब दिला आहे. त्याद्वारे क्यूआर कोड, यूपीआय, डेबिट-क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग यापैकी कोणत्या पर्यायाच्या माध्यमातून शुल्क भरता येते, त्याची रिसीटही काही क्षणात उपलब्ध होते. या सुविधेचा लाभ घेण्यापूर्वी वापरकर्त्याला पोर्टलवर लॉगीन करावे लागते. शिक्षक, कर्मचाऱ्यांना त्यांचा एम्प्लॉई नंबर, तर विद्यार्थ्यांना पीआरएन नंबरवर लॉगीन करता येते. कोणत्याही बँकेद्वारे ऑनलाईन शुल्क भरता येते.

### रोजची ३० लाखांची रोकड

■ ऑनलाईन सुविधा सुरू होण्यापूर्वी विविध शुल्कांच्या माध्यमातून जमा-स्वीकृत विभागात रोज सुमारे ३० लाखांची रोकड जमा व्हायची. ती हाताळण्याचा या विभागातील कर्मचाऱ्यांवर काहीसा तणाव येत होता. आता मात्र ऑनलाईन सुविधेमुळे संबंधित रक्कम थेट बँक खात्यात जमा होत असल्याने तणाव, कामाचा अतिरिक्त भार कमी झाला आहे. काम अधिक सोपे झाले असल्याचे जमा स्वीकृती विभागाचे अधीक्षक सुभाष संकपाळ यांनी सांगितले. पूर्वी रोज किमान ४०० जण पैसे भरण्यासाठी येत होते. आता दिवसातून सरासरी १० जण येतात. त्यांच्यासाठी विभागात दोन संगणक उपलब्ध करून नव्या सुविधेची माहिती, थोडक्यात प्रशिक्षण देत असल्याचे तांत्रिक सहायक सतीश हुक्केरी यांनी सांगितले.

तरूण भारत

# विद्यापीठात मिळणार स्टार्टअपला प्रोत्साहन


प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशनमध्ये इनक्युबेशन सेंटर सुरू झाले आहे. या केंद्रात शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्न आदी क्षेत्रातील २३ स्टार्टअप उद्योगांना बळ दिले जात आहे. विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना तृणधान्य पेरणी, मशागत, उत्पादन, साठवण तसेच मार्केटिंगमध्ये उद्‌भवणाऱ्या समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमातून देण्यात आली आहे.

नाविन्यपूर्ण संकल्पना व त्यावरील उद्योग याबाबत केंद्रातून नवयुवकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या निवड झालेल्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य, स्टार्टअप इंडिया, केंद्र सरकार, एम.एस.एम.ई. व इतर शासकीय व खाशगी संस्थांकडून सीड-मनी मिळण्याची संधी आहे.

- तृणधान्य, पेरणी, मशागत आदीसंदर्भात मिळणार मार्गदर्शन



तरी विद्यार्थी, शिक्षक व नागरिक यांनी आपल्या संकल्पना १५ मार्च २०२३ पर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर जाऊन गुगल फॉर्ममध्ये भराव्यात व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य केंद्राचे संचालक प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत ०२३१-२६०९४४० येथे संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात मिळणार 'स्टार्टअप'ना प्रोत्साहन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशन हे इनक्युबेशन सेंटर सुरू झाले असून येथे शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, इ. क्षेत्रांतील २३ स्टार्टअप उद्योगांना बळ दिले जात आहे.

या सेंटरमध्ये विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना तृणधान्य पेरणी, मशागत, उत्पादन, साठवण तसेच मार्केटिंगमध्ये उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उपाय सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमातून देण्यात आली आहे. इतर विषयांवरीलही नावीन्यपूर्ण संकल्पना व त्यावरील उद्योग याबाबत केंद्रातून नवयुवकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. निवड झालेल्या स्टार्टअप्सना सीड-मनी मिळण्याची संधी आहे. इच्छुकांनी आपल्या संकल्पना १५ मार्चपर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर भराव्यात असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधनचे संचालक प्रा. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

0 3 MAR 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा दिवस 'जपान'मय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जपानी ओरिगामी कला, पारंपरिक खेळ, वस्त्र परंपरा, चित्रकला, संगीत आदींच्या साथीने शिवाजी विद्यापीठातला बुधवारचा दिवस जपानमय होऊन गेला.

जपानच्या क्योतो सेइका विद्यापीठातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी विद्यापीठास भेट दिली. शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा अधिविभाग, इंटरनॅशनल अफेअर्स सेल यांच्या संयुक्त विद्यमाने जपानी शिक्षक, विद्यार्थी भेटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी जपानी विद्यार्थ्यांनी चित्रे, संगीत, शिल्पकला, व्हिडीओ, जपानी पारंपरिक वस्त्र, डिझाईन, मांगा कॉमिक्स आदी विविध कलाविष्कारांचा स्थानिक विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. ओरिगामी, जपानी पारंपरिक खेळ केन्दामा यांची प्रात्यक्षिके दाखवली. समन्वयक सायुरी मात्सुनो आणि क्योतो सेइका विद्यापीठातील प्रा. शिन मात्सुमुरा, कोता तोदा, युको यासुइ तसेच विविध विद्याशाखांचे विद्यार्थी रिन्तारो फुजिता, तेम्मा मियोशी, कोता योशिओका, रियोता सकामोतो, केन योशिकावा, त्सुमुगी निशिमुरा, मोएको नाइतो, युकिका नारादाते, कुणाल मात्सुनो यांचा या प्रतिनिधी मंडळात समावेश होता.



बुधवारी सकाळी समन्वयक मात्सुनो, प्रा. मात्सुमुरा यांनी डॉ. मेघा पानसरे व इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. एस. बी. सादळे यांच्यासह कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची भेट घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता प्रा. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते. प्रा. एस. बी. सादळे यांनी आभार मानले.

पुढारी

# मृणाल कांबळेची द. आशियाई कुराश स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



मृणाल कांबळे

ढाका (बांगलादेश) येथे होणाऱ्या दक्षिण आशियाई कुराश चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी कोल्हापूरच्या मृणाल नितीन कांबळे (कसबा बावडा) हिची निवड झाली आहे.

दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय निवड चाचणीत मृणालयने विशेष कामगिरीसह हे यश मिळविले. ती शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी असून एमएससी बायोकेमिस्ट्रीच्या पहिल्या वर्षात शिकत आहे. तीला जिल्हा कुराश संघटनेचे अध्यक्ष डॉ. विशाल धापटे, सचिव नितीन कांबळे, राज्य संघटनेचे अध्यक्ष अंकुश नगरकर, सचिव संजय धोपोरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# जावडेकर महाविद्यालयात बुधवारी कार्यशाळा

गारगोटी : येथील आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बुधवारी (ता. ८) 'इंग्रजी संभाषण, सृजनात्मक लेखन व पाठ नियोजन' यावर कार्यशाळा होईल. ११ ते ५ या वेळेत कार्यशाळा होईल. शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालयांतर्गत के. आय. टी कॉलेजचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. महेश शिंदे मार्गदर्शन करतील. मौनी विद्यापीठाचे चेअरमन मधुकर देसाई, मौनी विद्यापीठाच्या विश्वस्त पल्लवीताई कोरगावकर, संचालक डॉ. पी. बी. पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेसाठी इंग्रजी विषय प्राध्यापक, शिक्षक, शिक्षक प्रशिक्षणार्थींनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. पी. बी. दराडे यांनी केले आहे.

तरूण भारत

# राज्यस्तरीय ॲथलेटिक स्पर्धा ४ व ५ रोजी कोल्हापुरात

■ २५ जिल्ह्यातून १५०० खेळाडूंचा सहभाग



प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील जिल्हा ॲथलेटिक असोशिएशनच्यावतीने व राज्य ॲथलेटिक असोशिएशनच्या मान्यतेनूसार शनिवार दि.४ व ५ मार्च दरम्यान, सब ज्युनिअर ॲथलेटिक चॅम्पियनशिप स्पर्धांचे आयोजन केले असल्याची माहिती जिल्हा ॲथलेटिक असोशिएशनचे अध्यक्ष आर. बी. पाटील यांनी दिली. बुधवारी असोशिएशनच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पाटील म्हणाले, या स्पर्धेत २५ जिल्ह्यातून १५०० खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर सकाळी ८ वाजता सुरू होणार आहे. स्पर्धकांनी शुक्रवारी (३) रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत रिपोर्टिंगसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपाध्यक्ष एस. व्ही. सुर्यवंशी, सेक्रेटरी एस. जे. फराकटे, खजानीस आर. डी. पाटील, एच. एन. सरनाईक, आर. व्ही. शेटगे, के. एस. लाड, पी. एम. मांगोरे–पाटील, सचिन पाटील आदी उपस्थित होते.